IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महाराष्ट्रातील खंडकरी शेतकऱ्यांचा यशस्वी लढा : एक ऐतिहासिक आढावा

**प्रा. डॉ. गाढवे किशोर गुलाब**
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड, ता.वाई.जि.सातारा.

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*आधुनिक महाराष्ट्र*
*खंडकरी*

**ABSTRACT**

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण ही अनेक राजकीय व सामाजिक चळवळी मधून झालेली आहे. प्रचलित व्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी अनेकजण एकत्र येऊन एका विचाराने सामुहिक कृतीशील लढा उभारतात त्याला सामाजिक चळवळ असा आशय प्राप्त होतो.याच कृतीशील विचारातून महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन खाजगी उद्योगपतींच्या विरोधात संघटीत होऊन १९५२ ते २०१२ असा ६० वर्ष अहिंसेच्या मार्गाने खंडकरी शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी परत मिळविण्यासाठी कायदेशीर मार्गाने लढा दिला. खंडकरी शेतकऱ्यांनी खंडाने दिलेल्या जमिनी कराराचा कालावधी संपल्यानंतर रीतसर कसण्यासाठी परत मिळाव्यात या सनदशीर मागणीचा लढा ६० वर्ष लढविला आणि यश मिळविले. देशातील सर्वात दीर्घकाळ चाललेला ऐतिहासिक लढा म्हणून याची नोंद झाली आहे. शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात खाजगी उद्योगपती, कारखानदार यांच्या बरोबरच सरकारनेही वेळोवेळी उठवलेला दिसतो. पश्चिम महाराष्ट्रात विकासाच्या नावाखाली ब्रिटीश सरकारकडून खाजगी कारखानदारीला चालना देण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रात उसापासून गुळ तयार केला जात होता. ब्रिटीश सरकारने ऊसापासून साखर तयार करण्यासाठी खाजगी कारखानदारीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Gadhave, K. G. (2025). *महाराष्ट्रातील खंडकरी शेतकऱ्यांचा यशस्वी लढा : एक ऐतिहासिक आढावा.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **716–720**.

**प्रस्तावना: (Introduction ):-**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणी मध्ये स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात विविध क्षेत्रात राजकीय व सामाजिक चळवळी घडून आलेल्या दिसतात. अशा प्रकारच्या चळवळीमधुनच सामाजिक विकासाला चालना मिळालेली दिसते. भारत देश हा कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. शेतकऱ्याला जगाचा पोशिदा मानले जाते.परंतु मानवजातीचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याची अवस्था मात्र दयनीय असलेली दिसते. त्याच्या अज्ञानाचा फायदा स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात खाजगी उद्योगपती, कारखानदार यांच्या बरोबरच सरकारनेही वेळोवेळी उठवलेला दिसतो. पश्चिम महाराष्ट्रात विकासाच्या नावाखाली ब्रिटीश सरकारकडून खाजगी कारखानदारीला चालना देण्याचा प्रयत्न झाला. याची सुरुवात १९२० सालापासून झालेली दिसते.[१] महाराष्ट्रात उसापासून गुळ तयार केला जात होता. ब्रिटीश सरकारने ऊसापासून साखर तयार करण्यासाठी खाजगी कारखानदारीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला. १९३२ ते १९४७ या कालखंडात पश्चिम महाराष्ट्रात ऊसाचे हमखास उत्पादन होण्यासाठी पुणे आणि नाशिक भागात धरणांचे बांधकाम करून बारमाही पाणी उपलब्ध होईल अशी व्यवस्था करण्यात आली. शेतकऱ्यांच्या जमिनी खंडाने घेण्याचा प्रयत्न झाला. यासाठी अत्यंत अल्प दराने एकरी २ ते ५ रुपये मोबदला शेतकऱ्यांना देण्यात आला.[२] नाममात्र खंड देऊन शेतकऱ्यांना आपल्या जमिनी उद्योगपती, कारखानदारांना द्याव्या लागल्या होत्या. परंतु खंडाची रक्कम अल्प असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी देण्यास विरोध केला. परंतु सरकारच्या दबावापुढे काही चालले नाही. “आम्हाला आमच्या जमिनी परत द्या” अशी मागणी करायला शेतकऱ्यांनी सुरुवात केली. हीच आंदोलनाची सुरुवात होती असे म्हटले तर वावगे ठरू नये. आंदोलक शेतकऱ्यांची मागणी मान्य होण्यासाठी २०१२ साल उजाडावे लागले. या दरम्यानच्या काळात खंडकरी शेतकऱ्यांचे आंदोलन आकाराला आले. यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागला.

**१. संशोधन पद्धती :-** प्रस्तुत शोधनिबंध तयार करत असताना ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. फलटण संस्थानातील दरबार पत्रिका, संस्थांनचा वार्षिक अहवाल तपासण्यात आला आहे. याबरोबरच महाराष्ट्र शासना मार्फत पकाशित होणारे ‘लोकराज्य’ मासिकातील लेखाचा आधार घेतला आहे.

**२.स्वातंत्र्यपूर्व काळातील ब्रिटीश सरकारची भूमिका:**

आर्थिक लाभ मिळविणे हे ब्रिटीश सरकारच्या व्यापारी धोरणाचे उद्दिष्ट होते. या धोरणाचा भाग म्हणूनच सरकारचे अधिकारी कमी किमतीत शेतकऱ्यांचा माल खरेदी करून तो माल इंग्लडला पाठविला जात असे. त्याचे पक्क्या मालात रुपांतर करून भारतात व जगभर पाठवून त्याव्दारे प्रचंड नफा मिळविण्याचे धोरण सरकारचे होते.परंतु या धोरणानुसार ऊसासारखा कच्चा माल मायदेशी इंग्लंडला पाठवणे शक्य नसल्याने भारतातच ऊस पिकवून त्यापासून साखर निर्मितीला प्रोत्साहन दिले. ऊसाच्या पिकाला पाणी भरपूर लागते ती गरज पूर्ण करण्यासाठी पुणे आणि नाशिक जिल्ह्यात धरणे बांधून पाण्याची व्यवस्था केली.[३] ऊसाचे उत्पादन वाढविण्यासाठी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी खंडाने / भाडेपटयाने किंवा विकत घेऊन सुरुवातीला ब्रिटीशांना व कालांतराने काही भारतीय कंपन्यांना खाजगी साखर कारखाने काढण्यास प्रोत्साहन दिले. यातूनच फलटण तालुक्यातील साखरवाडी येथे “माधवराव आपटे फलटण शुगर मिल” या नावाने खाजगी साखर कारखाना सुरु करण्यास परवानगी देण्यात आली होती.[४] फलटण संस्थांनचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे नाईक-निंबाळकर यांची भूमिका मात्पूर्ण ठरली होती.

पारतंत्र्यात जखडलेल्या अज्ञान व असहाय्यतेच्या जोखडात अडकलेल्या शेतकरी समाजाचा पुरता फायदा ब्रिटीशांनी आणि खाजगी उद्योगपतींनी उठवला. यासाठी साम-दाम-दंड–भेद या मार्गाचा अवलंब करून शेतकऱ्यांच्या जमिनी अन्यायकारक पद्धतीने खंडाने / भाडेपट्याने वार्षिक अत्यंत अल्प २ ते ५ रुपये दराने ३० वर्ष आणि पुढे ८७ वर्षाच्या खंडाने / भाडेपट्याने करार केले. खंडाच्या दरामध्ये वार्षिक ५० रु.पर्यंत वाढ केली. या अंतर्गत ४८६७६ एकर जमीन खंडाने आणि ३६९२८ एकर जमीन खरेदी केली. सात जिल्हे यामध्ये महाराष्ट्रातील पुणे, सोलापूर, नाशिक, कोल्हापूर, सातारा, अहमदनगर आणि औरंगाबाद जिल्ह्यांचा समावेश होता. १३ तालुके इंदापूर, माळशिरस, फलटण, मालेगाव, कोपरगाव, कोल्हापूर, गंगापूर इ. आणि १०३ गावातील जमिनी कारखानदारांनी ताब्यात घेऊन एकूण उत्पन्नाच्या ६ वा भाग कायद्यानुसार खंड द्यावा लागत असताना प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा उठवत अत्यंत अल्प २ ते ५ रुपये दराने करार करण्यात आले. कारखानदारा बरोबर करार केल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना भूमिहीन व्हावे लागले.विस्थापितांचे जीवन जगावे लागले.काही शेतकऱ्यांनी कंपनीने घेतलेल्या आपल्याच जमिनीमध्ये शेतमजूर म्हणून काम करण्याचा निर्णय घेतला. तर काही लोकांना कंपनीने शिपाई पदावर रोजंदारीने कामावर ठेवले. अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर घरगडी म्हणून कामाला ठेवले. परंतु अनेकांच्या वाट्याला दयनीय जीवन जगण्याची वेळ आली.[५]

**२. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील सरकारी धोरण:**

१५ ऑगस्ट१९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले.स्वातंत्र्यानंतर आपले सरकार आपणाला न्याय देईल अशी अपेक्षा खंडकरी शेतकऱ्यांची होती.परंतु खंडकरी शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत गांभीर्याने व न्यायपूर्वक विचार झाला नाही.करार संपल्यानंतर शेतकऱ्यांना जमिनी परत न करता उपेक्षाच करण्यात आली. शेतकऱ्यांच्या मालकी हक्काच्या जमिनी परत करण्यास टाळाटाळ सुरु झाली. एवढेच नाही तर महाराष्ट्र सरकारने १९६१ मध्ये कमाल जमीन धारणा कायद्याची अंमलबजावणी सुरु करून कारखान्याकडील सर्व जमिनी सरकार जमा करून खंडकरी शेतकऱ्यांना मालकी हक्कापासून बेदखल केले. १९६३ मध्ये "महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची" स्थापना करून सर्व जमिनी शेती महामंडळाला सुरुवातीला तीन वर्षासाठी देण्यात आल्या. पुढे याची आवश्यकतेनुसार कालमर्यादा वाढवण्यात आली. दरम्यानच्या काळात १९५२-५३ पासून अहमदनगर व साखरवाडी येथे कम्युनिस्ट पक्षाच्या नेत्यांनी खंड वाढीसाठी आंदोलन केले. यामध्ये क्रांतिसिह नाना पाटील, माधवराव गायकवाड, पैलवान बाजीराव जगताप, बी.आर.पाटील, भागवत व्यवहारे, कमल व्यवहारे यांनी खंडाची रक्कम दर एकरी ३५ ते ५० रुपया पर्यंत वाढवून मिळाली पाहिजे यासाठी सत्याग्रह करण्याचा प्रयत्न केला.[६]

३. **फलटण तालुक्यातील खंड वाढीसाठी श्रीमंत मालोजीराजे यांचे सहकार्य:**

फलटण तालुक्यात साखरवाडी येथे १९३३ साली माधवराव आपटे फलटण शुगर फॅक्टरीची स्थापना करण्यात आली होती. या शुगर फॅक्टरीला स्वत:च्या मालकीच्या जमिनीतून ऊस मिळावा म्हणून या परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी खंडाने घेतल्या होत्या. या परिसरातील शेतकऱ्यांकडे इरीगेशनची पाणी पट्टी व फलटण संस्थानचा जमिनीवरील कर थकलेला होता. फलटण संस्थानचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे यांनी मध्यस्थी करून शेतकऱ्यांचा कर शुगर फॅक्टरीने भरावा असे ठरवून शेतकऱ्यांच्या जमिनी कारखान्याकडे खंडाने देऊन शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले. परंतु ही तडजोड शेतकऱ्यांना पटली नव्हती. स्वातंत्र्यानंतर या परिसरातील शेतकऱ्यांनी सत्याग्रह सुरु करून शुगर फॅक्टरीने केलेल्या ऊसाची लागण उपटणे,ऊस पेटवून देणे

यासारखी अडथळ्याची कामे करण्यास सुरुवात केली. श्रीमंत मालोजीराजे यावेळी मंत्रिमंडळात होते.त्यांनी जमीन मालकांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.पण त्याचा उपयोग झाला नाही.मग जमीन मालक खंडकरी शेतकरी यांची लेखी संमती घेऊन 'फलटण तालुका खंड वाढ समिती' स्थापन केली.याचे अध्यक्षपद लक्ष्मणराव निंबाळकर यांच्याकडे दिले. या समितीने साखरवाडी शुगर फॅक्टरी बरोबर चर्चा करून शेतकऱ्यांना दर एकरी ५० /- खंडवाढ मिळवून दिली.[७] खंड वाढ अल्प प्रमाणात झाल्यामुळे पुन्हा एकवेळ खंडकरी शेतकऱ्यांनी जमिनी माघारी मिळाव्यात यासाठी आंदोलनाला सुरुवात केली.

४. **१९६२ नंतर खंडकरी शेतकऱ्यांचा शासनाशी लढा :**

१९५२ पासून खंडकरी शेतकरी जमिनी परत मिळविण्यासाठी खाजगी उद्योगपतींच्या विरोधात लढा देत होते. १९६२ नंतर हा लढा शासनाशी सुरु झाला. कमाल जमीन धारण कायदा आणि महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची स्थापना करून खंडकरी शेतकऱ्यांना जमीन मालकी हक्कापासून बेदखल केले होते. खंडकरी शेतकऱ्यांचा विरोध मोठ्यां प्रमाणात वाढल्यामुळे सरकारने शेती महामंडळातील कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळू नये यासाठी १९७० मध्ये साडेचार एकर जमीन परत करण्याचा निर्णय घेतला.यासाठी अट घातली की,ज्या शेतकऱ्यांचे वार्षिक उत्पन्न चार हजार रुपयांच्या आत आहे आणि जे फक्त शेतीच करतात अशाच शेतकऱ्यांना जमीन देण्यात येईल. या योजनेंतर्गत १५ हजार एकर जमिनीचे वाटप करण्यात आले.[८]

खंडकरी शेतकऱ्यांनी राहिलेली जमीन परत मिळावी ही मागणी पुढे सुरूच ठेवली.यासाठी उपोषणे,मंत्रालयावर मोर्चा काढणे ऊसाचे लागवड केलेले क्षेत्र नांगरणे या मार्गांचा अवलंब केला. या प्रकरणात अनेक खंडकरी शेतकऱ्यांवर खटले दाखल करण्यात आले होते. १९७५ मध्ये सिलिंग कायद्यात दुरुस्ती करण्यात आली.यानुसार एका शेतकऱ्याला १८ एकर बागायती जमीन आणि ५४ एकर जिरायती क्षेत्र धारण करता येईल अशी तरतूद करण्यात आली होती. शेवटी १९९७ मध्ये महाराष्ट्र सरकाने खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याचा महत्वपूर्ण निर्णय जाहीर केला.[९]

५. **समितीची स्थापना:**

खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी परत देण्याच्या संदर्भात राज्य सरकारने इ.स.२००० मध्ये समिती नेमली. या समितीचे अध्यक्ष म्हणून आमदार रामराजे निंबाळकर तर सदस्य म्हणून हर्षवर्धन पाटील, राधाकृष्ण विखे –पाटील आणि जयंत ससाणे यांची नेमणूक करण्यात आली. या समितीने कामगारांचे आस्तित्व सुरक्षित ठेवून खंडकरी शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत देण्यासंदर्भात २००१ साली आपला अहवाल शासनाला आणि न्यायालयाला सादर केला. या अहवालाला शासनाने मान्यता दिल्यानंतर राज्य सरकारने कायदा केला.राष्ट्रपतींची संमती घेण्यात आली. कामगारांनी घेतलेल्या हरकती चा निवाडा करत न्यायालयाने शासनाच्या बाजूने निकाल दिल्यानंतर नोव्हेंबर २०१२ मध्ये खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी परत देण्यास सुरुवात झाली.[१०] शेतकऱ्यांना जमिनी परत देण्याचा निर्णय ऐतिहासिक होता. १९५२ ते २०१२ या कालावधीत ६० वर्ष खंडकरी शेतकऱ्यांनी संघटीतपणे दिलेला लढा अखेर यशस्वी झाला.

**मूल्यमापन: (Conclusion)**

खंडकरी शेतकऱ्यांनी १९५२ ते २०१२ असा ६० वर्ष अहिंसा तत्वाच्या आधारे आपल्या जमिनी परत मिळविण्यासाठी कायदेशीर मार्गाने संघर्ष केला. खंडकरी शेतकऱ्यांनी खंडाने दिलेल्या जमिनीचा कराराचा कालावधी संपल्यानंतर त्या रीतसर

कसण्यासाठी परत मिळाव्यात या सनदशीर मागणीसाठी देशातील सर्वात दीर्घकाळ चाललेला ऐतिहासिक लढा म्हणून याची नोंद झाली आहे. १९३२ ते १९४७ या कालखंडात पश्चिम महाराष्ट्रात ऊसाचे हमखास उत्पादन होण्यासाठी पुणे आणि नाशिक भागात धरणांचे बांधकाम करून बारमाही पाणी उपलब्ध होईल अशी व्यवस्था करण्यात आली. शेतकऱ्यांच्या जमिनी खंडाने घेण्याचा प्रयत्न झाला. याला संस्थानिकांचा,राजकीय मंडळींचा पाठिबा होता. "आम्हाला आमच्या जमिनी परत द्या" अशी मागणी करायला शेतकऱ्यांनी सुरुवात केली. आंदोलक शेतकऱ्यांची मागणी मान्य होण्यासाठी २०१२ साल उजाडावे लागले. शेवटी २३ फेब्रुवारी २००३ साली राज्य सरकारने राष्ट्रपतींची मंजुरी घेतल्यानंतर जमीन वाटपाचा घेतलेला निर्णय ऐतिहासिक असाच होता. कारण या निर्णयामुळे **खंडकरी शेतकऱ्यांच्या जमिनी सिलिंग मर्यादेत परत केल्याने खऱ्या अर्थाने तो जमिनीचा मालक होणार होता. या जमिनीत उत्पादन घेऊन आर्थिक स्थैर्य प्राप्त होणार होते. हे खंडकरी शेतकऱ्यांच्या सातत्यपूर्ण आंदोलनाचे यश होते.** खंडकरी शेतकऱ्यांचे आंदोलन आजही चालूच आहे. १९८२ ते २०१२ या कालखंडातील वाढीव खंडाची रक्कम शेतकऱ्यांना मिळालेली नाही. थकीत रक्कमेचा लढा शासन दरबारी चालूच आहे.

**संदर्भ :- (References)**

१. फलटण दरबार आज्ञा पत्रिका ,१५ डिसेंबर १९३६ पृ.३

२. फलटण दरबार आज्ञा पत्रिका ,१५ डिसेंबर १९३७ पृ.५२-५३

३. श्रीमंत मालोजीराजे मु.ना. निंबाळकर राजेसाहेब फलटण, स्मरणिका ८ जानेवारी १९८३ पृ.५३

४. फलटण संस्थांचा वार्षिक प्रशास्की अहवाल सन १९३४-३५ पृ.३०

५. श्रीमंत मालोजीराजे मु.ना. निंबाळकर राजेसाहेब फलटण, स्मरणिका ८ जानेवारी १९८३ पृ.५४

६. फडके.य.दी.,विसाव्या शतकातील महाराष्ट्र,खंड, ६ पहिली आवृत्ती -२००७ मौज प्रकाशन गृह गिरगाव मुंबई पृ.४३

७. लोकराज्य जानेवारी २०१३, गायकवाड पांडुरंग(पाटील),खंडकऱ्याचा यशस्वी लढा, पृ.५३

८. उपरोक्त, लोकराज्य जानेवारी २०१३, पृ.५४

९. कित्ता, पृ.५४

१०. कित्ता, पृ.५५